# || सदगुरु प्रार्थना ||

सदगुरु नाथा हात जोडीतो अंत नको पाहु ।
ऊकलुनी मनीचे हितगुज सारे वद कवणा दावू ।।धृ०।।

निशीदिनी श्रमसी मम हितार्थ तू किती तुज शीण देऊ ।
हृदयी वससी परी नच दिससी कैसे तुज पाहु ।।१।।

उत्तीर्ण नव्हे तुज उपकारा जरी तनु तुज वाहू ।
बोधुनि दाविसी इहपर नश्वर मनी उठला बाऊ ।।२।।

कोण कुठील मी कवण कार्य मम जनी कैसा राहू ।
करी मज ऐसा निर्भय निश्चल सम सकला पाहू ।।३।।

अजाण हतबल भ्रमीत मनिची तळमळ कशी साहू ।
निरसूनी माया दावी अनुभव प्रचिती नको पाहू ।।४।।